(इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२३] ३ एस.सी.आर. ५६

अनंत ठानूर करमुसे

वि.

महाराष्ट्र राज्य आणि इतर

(फौजदारी अपील क्र. १३/२०२३)

फेब्रुवारी २४, २०२३

**[एम. आर. शाह न्या. आणि सी. टी. रविकुमार न्या.]**

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ - क. १७३ (८) - पुढील तपास - केंद्रीय अन्वेषण विभागकडे तपास हस्तांतरित – अपीलकर्त्याने तत्कालीन कॅबिनेट मंत्र्याचा व्हाईरल झालेले छायाचित्र फेसबूकवर शेअर केला - अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार, पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांच्या निवासस्थानाहून बळजबरीने नेले आणि पोलिसांनी त्यांना मारहाण केली आणि धमकी दिली - अपीलकर्त्याने प्र्थम खबरी अहवाल दाखल केला, परंतु प्रथम खबरी अहवालात कॅबिनेट मंत्र्याचे नाव नव्हते. - उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती आणि तपास हा केंद्रीय अन्वेषण विभाग किंवा इतर कोणत्याही एजन्सीला हस्तांतरित करण्याची विनंती केली.

- रिट याचिका प्रलंबित असताना, दाखल केलेल्या दोषारोपपत्रांच्या आधारे न्यायचौकशी न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित केले - उच्च न्यायालयाने तपास हस्तांतरित करण्याची मागणी नाकारली. - उच्च न्यायालयाने याचिका फेटाळताना निरीक्षण नोंदविले की, एकदा का दंडाधिकारी/न्यायचौकशी न्यायालयाने दोषारोप निश्चित केले की न्यायचौकशी सुरू झाली आहे, असे म्हणता येईल आणि म्हणूनच त्यानंतर पुर्न:तपास/पुढील तपासाची परवानगी नाही - आपिलामध्ये असा निर्णय देण्यात आला की केवळ " दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्येच" तपास हा केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो. - उच्च न्यायालयाने तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यास नकार देताना कोणतीही चूक केलेली नाही. - उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आणि उच्च न्यायालयाने सध्याच्या कामकाजात विविध आदेश दिल्यानंतरच खरा तपास सुरू झाला. - राज्य तपास यंत्रणेच्या म्हणण्यानुसार सुद्धा, काही बाबतीत पुढील तपास आवश्यक आहे. - पीडीतास नि:पक्ष तपास आणि नि:पक्ष न्याय चौकशीचा मूलभूत अधिकार आहे. - त्यामुळे, केवळ दोषारोपपत्र दाखल करणे आणि आरोप निश्चित करणे हे जर पुढील तपास/ पुर्न:तपास/ नव्याने तपासाच्या आदेशात अडथळा ठरू शकत नाही, जर तथ्ये तशी हमी देत असतील तर - संबंधित वेळी राज्य तपास यंत्रणेने योग्य तपास केला नव्हता आणि भौतिक पुरावे देखील गोळा केले नव्हते. - उच्च न्यायालयाने प्र.ख.अहवाला मध्ये राज्य पोलिस यंत्रणेला पुढील चौकशी करण्याचे आदेश न देण्याची आणि/किंवा परवानगी न देण्याची अत्यंत गंभीर चूक केली आहे.

अपील अंशतः मंजूर करून न्यायालयाने असा निर्णय दिला की :

१. प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती मध्ये कायद्याची स्थिती लक्षात घेता, या न्यायालयाचे असे मत आहे की उच्च न्यायालयाने तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यास नकार देताना कोणतीही चूक केलेली नाही. अपीलकर्त्याने सुद्धा अशा काही मागणीचे जोरदारपणे समर्थन केले नाही. जोवर केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित करण्यास नकार देण्याबाबतच्या उच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टिकोणाचा संबंध येतो, त्याच्याशी हे न्यायालय पूर्णपणे सहमत आहे. धरमपाल (उपरोल्लेखित) आणि भारती तमंग (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाने घालून दिलेला कायदा लागू करून आणि पूर्ण न्याय देण्यासाठी आणि नि:पक्ष तपास आणि नि:पक्ष खटला चालवण्यासाठी, घटनात्मक न्यायालय पुढील तपास/ पुर्न:तपास / नव्याने तपासाचे आदेश आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आणि दोषारोप निश्चित झाल्यानंतरही तपासाचा आदेश पारित करू शकतात. [परि. ७.४ आणि ११ ] [७०-ई - एफ ; ७५-डी]

३. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सध्याच्या प्रकरणात अगदी सुरुवातीपासूनच, प्रथम खबरी अहवाला मधील आरोप, आरोपी क्रमांक १३ विरुद्ध होते, जो संबंधित वेळी उच्च पदावर विराजमान विद्यमान कॅबिनेट मंत्री होता. तसेच त्या संबंधित वेळी, जेव्हा राज्य पोलिसांनी २०२० च्या एफआयआर क्रमांक १२० चा तपास केला, तेव्हा पहिल्या दोषारोपत्रात आणि दुसऱ्या दोषारोपपत्रात आरोपी क्रमांक १३ चे नाव दिलेले नव्हते. इतकच नाही तर तपास देखील वर वर करण्यात आला होता. उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आणि उच्च न्यायालयाने सध्याच्या कामकाजात विविध आदेश दिल्यानंतरच खरा तपास सुरू झाला.

प्रथम खबरी अहवालामधील आरोप अत्यंत गंभीर होते, त्यात विद्यमान कॅबिनेट मंत्र्याने त्याच्या अधिकारांचा गैरवापर करणे आणि फिर्यादीचे अपहरण आणि व्यपहरण करणे, आणि मारहाण करणे यांचा समावेश आहे. [परि. १२.१] [७५-जी-एच ; ७६-ऐ-बी]

४. जरी असे असले तरी, राज्य तपास यंत्रणेच्या म्हणण्यानुसार सुद्धा, पुढील तपास आवश्यक आहे. या न्यायालयाने आपल्या विविध निर्णयांमध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे आणि निर्णय दिल्याप्रमाणे पीडीतास नि:पक्ष तपास आणि नि:पक्ष न्यायचौकशी चा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे, त्यामुळे, केवळ दोषारोपपत्र दाखल करणे आणि आरोप निश्चित करणे हे जर पुढील तपास/ पुर्न:तपास/ नव्याने तपासाच्या आदेशात अडथळा ठरू शकत नाही. [परि. १२.३] [७७-बी]

५. न्यायालयाचा प्रयत्न फक्त नि:पक्ष तपास आणि नि:पक्ष न्यायचौकशी व्हावी एवढाच असला पाहिजे आणि म्हणून, वर कथन केलेल्या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीमध्ये, या न्यायालयाचे असे मत आहे की पुढील तपासासाठी प्रकरण सिद्ध केले जाते आणि राज्य तपास यंत्रणेला पुढील तपास करण्याची आणि पुढील पुरावा अभिलेखावर आणण्याची परवानगी दिली जाऊ शकते, जे कदाचित नि:पक्ष तपास आणि नि:पक्ष न्यायचौकशीच्या पुरःसरणार्थ केले जाऊ शकेल. उच्च न्यायालयाने २०२० च्या प्र.ख.अहवाल क्रमांक ११९ आणि १२० ची पुढील चौकशी करण्याचे आदेश न देण्याची आणि/किंवा परवानगी राज्य पोलिस यंत्रणेला न देण्याची अत्यंत गंभीर चूक केली आहे. उच्च न्यायालयाने येथे वर नमूद केलेल्या संबंधित पैलूंचा विचार केला नाही आणि म्हणून या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. [परि. १३] [७७-इ-जी]

हिमांशू कुमार आणि इतर वि. छातीसगड राज्य आणि इतर, **२०२२ एससीसी ऑनलाइन एससी ८८४** ; भारती तमंग वि. भारताचे संघराज्य आणि इतर, **(२०१३) १५ एससीसी ५७८ : [२०१३] १४ एससीआर ५२५** : धरम पाल वि. हरयाणा राज्य आणि इतर, **(२०१६) ४ एससीसी १६० : [२०१६] १ एससीआर १९४** - वर अवलंबून.

बाबुभाई वि. गुजरात राज्य आणि इतर, **(२०१०) १२ एससीसी २५४ : [२०१०] १० एससीआर ६५१** ; रामजेठमलाणी वि. भारताचे संघराज्य ऑनलाइन **(२०११) ८ एससीसी १ : [२०११] ८ एससीआर ७२५** : वीनुभाई हरिभाई मालविया आणि इतर वि. गुजरात राज्य आणि इतर, **(२०१९) १७ एससीसी १ : [२०१९] १५ एससीआर ९३६** ; रामा चौधरी वि. बिहार राज्य, (२००९) ६ एससीसी ३४६ : [२००९] ५ एससीआर ४८२ - संदर्भित.

**<u>निर्णय विधी संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२०१३] १४ एससीआर ५२५** | **अवलंबून** | **परी. ८.१, ११** |
| **[२०१०] १० एससीआर ६५१** | **संदर्भित** | **परी. ८.१** |
| **[२०११] ८ एससीआर ७२५** | **संदर्भित** | **परी. ८.१** |
| **[२०१६] १ एससीआर १९४** | **अवलंबून** | **परी. ३.४, ८.२, ११** |

**[२०१९] १५ एससीआर ९३६ संदर्भित परी. ५,६,९**

**[२००९] ५ एससीआर ४८२ संदर्भित परी. ५.७, १०**

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्र. १३/२०२३

रिट याचिका क्र. ४११/२०२१ मधील मुंबई उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय आणि आदेश दि . २६ /०४ /२०२२ वरुन.

महेश जेठमलानी, सिद्धार्थ दवे, वरिष्ठ अधिवक्ते , चिराग शहा, उत्सव त्रिवेदी, अनिरुद्ध गानू, श्रीमती मानीनी रॉय, हिमांशू सचदेवा, श्रीमती शिवानी भूषण, पियुष तिवारी, श्रीमती कांजनी शर्मा, प्रस्तुत दळवी, श्रीमती मुग्धा पांडे, श्रीमती आस्था प्रसाद, अपीलार्थीनकरिता अधिवक्ते।

तुषार मेहता, महान्यायअभिकर्ता, श्रीमती ऐश्वर्या भाटी, अतिरिक्त महान्यायअभिकर्ता डॉक्टर अभिषेक मानू संघवी, शेखर नाफाडे, वारिष्ट अधिवक्ते, श्रीमती दक्षा राय, तुषार सोनावणे, श्रीमती रागिनी पांडे, श्रीमती अतिगा सिंग, राहुल चिटणीस, सिद्धार्थ धर्माधिकारी आदित्य अनिरुद्ध पांडे, भारत बागला, श्रीमती कीर्ती दधीच, रजत नायर, प्रत्युष श्रीवास्तव, माधव सिंग सिनहाल, ऐ. के. शर्मा, उत्तरवादीकरिता अधिवक्ते.

**एम. आर. शाह न्या.** यांनी दिलेल्या न्यायालयाचा नयायनिर्णय :

**एम. आर. शहा न्या.**

१. मुंबई येथील उच्च न्यायालयाने दिनांक २६.४.२०२२ रोजी रिट याचिका क्रमांक ४११/२०२१ मध्ये दिलेला आक्षेपीत निर्णय आणि आदेशामुळे व्यथीत आणि असमाधानी

वाटून, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने यातील अपीलकर्त्याने-पीडिताने दाखल केलेली रिट याचिका फेटाळली आहे, ज्यात वर्तक नगर पोलीस स्टेशन, ठाणे येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवाल क्रमांक ११९/२०२० आणि १२०/२०२० चा तपास/पुर्न:तपास करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभाग किंवा इतर कोणत्याही ‘ एजन्सीकडे ’ (अभिकरणाकडे) हस्तांतरित करण्याची मागणी पीडित यांनी केली आहे, मूळ याचिकाकर्ता- पीडित याने हे अपील दाखल केले आहे.

२. या अपीलातील वस्तुस्थिती आणि अपीलकर्त्याची बाजू थोडक्यात खालील प्रमाणे आहे : -

२.१ अपीलकर्ता हा स्थापत्य अभियंता आहे, जो सल्लागार म्हणून काम करतो त्याने दिनांक ०५.०४.२०२० रोजी त्याच्या फेसबुक खात्यावर महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन कार्यरत कॅबिनेट मंत्री नामे श्री.जितेंद्र आव्हाड (ज्यांचे नाव माननीय उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आरोपी क्रमांक १३ म्हणून दाखल करण्यात आले) यांचे भारताचे मा.पंतप्रधान यांचा उपहास करण्याच्या कृतीवर टीका करणारे छायाचित्र प्रसारित केले. अपील कर्त्याच्या म्हणण्यानुसार ०५.०४.२०२० रोजी रात्री ११:५० च्या सुमारास चार पोलीस, दोन नागरी वेशभूषा केलेले आणि इतर २ गणवेशात असलेले त्यांच्या निवासस्थानी आले आणि त्यांना बळजबरीने त्या मंत्र्याच्या बंगल्यावर नेले. अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर मंत्र्याने त्याच्या माणसांना त्याला मारहाण करण्याचे निर्देश दिले आणि मंत्र्यांचे ते छायाचित्र प्रसारित केल्याबद्दल त्याला माफी मागावयास लावली. मंत्री महोदयांनी त्यांना लगेच ती पोस्ट काढून टाकण्याची धमकी

दिली. त्यानंतर मंत्र्यांचा एक सहकारी याने अपीलकर्ता याच्या नंबर वर फोन केला कारण त्याने आपला फोन त्याच्या घरी ठेवला होता आणि त्याच्या पत्नीला वादग्रस्त पोस्ट काढून टाकण्यास सांगितले. अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार, त्याला मंत्र्याच्या आवारात उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी निर्दयीपणे आणि अमानुषपणे मारहाण केली.

२.२ अपीलकर्ता, पोलीस स्टेशनमध्ये गेला आणि त्याला माहिती मिळाली की, श्री. हितेश वाणी या प्रकरणातील आरोपी क्रमांक ३ आणि मंत्र्याचा जवळचा सहकारी यांच्या तक्रारीवरून, जर त्याने या घटनेबाबत तक्रार करण्याचे ठरविले तर त्याला धमकावण्याच्या एकमेव उद्देशाने, पोलिसांनी त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता (आयपीसी) कलम २९२ आणि माहिती आणि तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (इ) च्या अंतर्गत प्रथम खबरी अहवाल क्रमांक ११९/२०२० दाखल करून घेतला. अपीलकर्त्याचे म्हणणे होते की, त्यानंतर अपीलकर्त्याने न घाबरता संपूर्ण घटना मंत्री आणि इतर पोलीस अधिकाऱ्यांवर केलेल्या विशिष्ट आरोपासह कथन केली आणि मंत्री आणि त्याच्या माणसांविरुद्ध तक्रार नोंदवली. तथापि, मंत्री ज्यांच्यावर विशिष्ट आरोप करण्यात आले होते आणि त्याच्या माणसांची नावे ही कलम ३६५, १४३, १४४, १४७, १४९, ३२४ आणि ५०६ (२) अंतर्गत दिनांक ०६.०४.२०२० रोजी वर्तक नगर पोलीस स्टेशन ठाणे येथे नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवाल क्रमांक १२०/२०२० मध्ये नमूद केलेली नाहीत. अपीलकर्त्याचे म्हणणे असे होते की, संबंधित मंत्री राज्य सरकारमध्ये तत्कालीन कार्यरत केंद्रीय मंत्री असल्याने त्याचे नाव प्रथम खबरी अहवालात नाही.

२.३ त्यानंतर पक्षपातीपणाची भीती वाटून आणि तसा आरोप करून आणि संपूर्ण तपास हा

खोट्या अयोग्य पद्धतीने आणि सहजपणे केला गेला आहे आणि पोलिसांनी कोणतेही महत्वपूर्ण काम केले नाही असा आरोप करून अपीलकर्त्याने या रिट याचिकेद्वारे उच्च न्यायालयात धाव घेऊन वर नमूद प्रथम खबरी अहवालाचा तपास हा केंद्रीय अन्वेषण विभाग, मुंबई किंवा इतर कोणत्याही एजन्सीला हस्तांतरित करण्याची विनंती केली.

त्यानंतर रिट याचिकेवर उच्च न्यायालयाने विविध अंतरिम आदेश पारित केल्याचे आणि राज्याच्या तपास यंत्रणेला तपास करण्यास भाग पाडले गेल्याचे दिसून येते. पोलिसांनी सुरुवातीला संबंधित मंत्री श्री जितेंद्र आव्हाड यांचे नाव आरोपी म्हणून न घेता आरोप पत्र दाखल केले. तथापि, त्यानंतर आणि उच्च न्यायालयासमोर रिट याचिका प्रलंबित असताना आणि उच्च न्यायालयाने तपासावर सतत लक्ष ठेवल्यामुळे, या घटनेच्या दोन वर्षानंतर मंत्री श्री जितेंद्र आव्हाड यांना आरोपी म्हणून जोडण्यात आले. त्यानंतर रिट याचिका प्रलंबित असताना, विद्वान न्याय चौकशी न्यायालयाने आधीच दाखल केलेल्या आरोपपत्रांच्या आधारे आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित केले, जे अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार प्रत्यक्षात केलेले गुन्हे जसे की अपहरण, व्यपहरण आणि गंभीर दुखापत यापेक्षा कमी गुन्ह्यासाठी होते. त्यानंतर उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, तपास केल्यानंतर आरोपपत्र दाखल केले आहे आणि उच्च न्यायालयाने प्रथम दर्शनी असे मत व्यक्त केले की, आरोपपत्र/ पुरवणी आरोपपत्र दाखल करून तपास यंत्रणांनी वैद्यकीय अहवाल विचारात घेतल्यानंतर आणि मोबाईल फोनचा सीआरडी गोळा केल्यानंतरच सर्व बाजूंनी तपास केला आहे आणि एकदा का दंडाधिकारी/न्यायचौकशी न्यायालयाने दोषारोप निश्चित केले की न्यायचौकशी सुरू झाली आहे, असे म्हणता येईल आणि म्हणूनच त्यानंतर पुर्न:तपास/पुढील तपासाची परवानगी नाही

म्हणून हायकोर्टाने तपास कें.अ.वि./ इतर कोणत्याही एजन्सीला देण्यासाठी केलेली सदर याचिका आक्षेपीत न्यायनिर्णय आणि आदेशावरून फेटाळून लावली. उच्च न्यायालयाने, आक्षेपीत न्यायनिर्णय आणि आदेशावरून सदर रिट याचिका फेटाळून लावली आहे.

२.४ आक्षेपीत न्यायनिर्णय आणि आदेशामुळे व्यथीत आणि असमाधानी वाटून मूळ याचिकाकर्ता - पीडित यांनी हा अपील दाखल केला आहे.

३. अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील, श्री. महेश जेठमलानी यांनी जोरदारपणे सादर केले की, संपूर्ण तपास राज्याच्या तपास यंत्रणेने खोट्या अयोग्य पद्धतीने आणि सहजपणे केला आहे कारण, आरोपी पैकी एक राज्याचा प्रभावशाली मंत्री होता.

३.१ असे सादर करण्यात आले की, मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड आणि त्यांच्या इतर व्यक्तींचे नावे प्रथम खबरी अहवाल उघड झाली होती अशी वस्तुस्थिती असूनही आणि अपहरण व गंभीर दुखापत अशी आरोप असलेली स्पष्ट केस असूनही मंत्री श्री जितेंद्र आव्हाड आणि त्यांची इतर मंडळी, यांच्या विरोधात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेला नव्हता. असे सादर करण्यात आले की, प्रलंबित रिट याचिकेत उच्च न्यायालयाने विविध आदेश पारित केले होते आणि माननीय उच्च न्यायालय तपासावर देखरेख ठेवत होते त्यामुळे आरोप पत्र/पूरक आरोप पत्र दाखल करण्यात आले आणि श्री. जितेंद्र आव्हाड यांना घटनेच्या दोन वर्षाच्या कालावधीनंतर पुरवणी आरोपपत्रामध्ये आरोपी म्हणून दाखल करण्यात आले.

३.२ पुढे असे करण्यात आले की, आरोपपत्र देखील कमी गुन्ह्यासाठी जसे की, कलम ३२४ आणि ३६५ आणि इतर कमी गुन्ह्यांसाठीच  दाखल केले आहे. असे सादर करण्यात आले कि, कलम ३२६ (गंभीर दुखापत) अन्वये गुन्ह्याची स्पष्ट केस असूनही, आणि छायाचित्रावरून हे सिद्ध झालेले आहे आणि कलम ३६७ अन्वये अपहरण या गुन्ह्याची स्पष्ट केस असूनही, भारतीय दंड संहिताच्या कलम ३२६ सह ३६७ अंतर्गत गुन्ह्यांसाठी आरोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही.

३.३ पुढे असे सादर करण्यात आले की, अपीलकर्त्याचे तसेच संबंधित आरोपींच्या मोबाईलचे सीडीआरच्या स्वरूपातील संबंधित पुरावे ही गोळा केलेले नाहीत. असे सादर करण्यात आले कि, तपास आणि आरोपींवरील आरोपांच्या मुळाशी जाणारे सीसीटीव्ही फुटेजही गोळा करण्यात आलेले नाही.

३.४ पुढे असे सादर करण्यात आले की, **धरमपाल विरुद्ध हरियाणा राज्य  आणि इतर  (२०१६) ४ एससीसी १६०** (परिच्छेद २५) या प्रकरणामध्ये या न्यायालयाने केलेल्या निरीक्षणानुसार आणि मान्य केल्याप्रमाणे, घटनात्मक न्यायालयांना नव्याने ‘डी नोवो’  किंवा पुर्न:तपासणीचे आदेश देण्याच्या अधिकारासह परिकल्पित करण्यात आले आहे आणि निरीक्षणानुसार आणि मान्य केल्यानुसार, हा घटनात्मक अधिकार जो निष्पक्ष  आणि न्याय्य  तपास  सुनिश्चित करण्यासाठी बनवला आहे त्याचा वापर करण्यासाठी न्यायचौकशी आणि काही साक्षीदारांची

तपासणी सुरू झाली हा पूर्णपणे असू शकत नाही.

३.५ अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान जेष्ठ वकील, श्री. जेठमलानी यांनी पुढे सादर केले की, **भारती तमंग विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर (२०१३) १५ एससीसी ५७८** या प्रकरणामध्ये या न्यायालयाने निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केल्याप्रमाणे, कमतरता /असमाधानकारक तपासाच्या बाबतीत अभियोगपक्षाचे प्रभावी वर्तन सुनिश्चित करणे हे न्यायालयांचे कर्तव्य आहे आणि न्यायालयांना अपवादात्मक परिस्थिती म्हणजेच कमतरता/असमाधानकारक तपास यामुळे गरज भासली तर अशावेळी पुर्नःतपासणीचे निर्देश देण्याचे अधिकार आहेत.

३.६ असे सादर करण्यात आले की, नमूद केलेल्या निर्णयांमध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केल्याप्रमाणे, तपास किंवा अभियोगपक्षाची कमतरता दिसून येत असल्यास किंवा वस्तुस्थिती लपविण्याचा किंवा स्पष्ट कमतरता लपविण्याचा प्रयत्न करणारा पडदा उचलून असे लक्षात येत असेल तर, न्यायालयांना त्यास कायद्याच्या चौकटीत राहून मजबूत हाताने योग्यरितीने तोंड द्यावे लागेल. असे सादर करण्यात आले की, पुढे असे निरीक्षण करण्यात आले की, संपूर्ण आणि महत्त्वाची तथ्ये अभिलेखावर आली आहेत याची खात्री करणे जेणेकरून न्यायच्युती होणार नाही, हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. सदर निर्णयाच्या परिच्छेद ४१ मध्ये या न्यायालयाने दिलेल्या निरीक्षणावर तो विसंबून आहे.

३.७ अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान ज्येष्ठ वकील, श्री जेठमलानी यांनी पुढे

असे सादर केले कि, आता सरकारने देखील आता प्रतिज्ञापत्रात विशेषतः मान्य केले आहे की, फौजदारी प्र. सं. च्या कलम १७३ (८) अंतर्गत न्यायाच्या हितासाठी काही संबंधित आणि भौतिक पैलूंवर पुढे काही तपास करणे गरजेचे/आवश्यक आहे. असे सादर करण्यात आले की, सरकारने भौतिक पैलूंवर वरील तपासातील त्रुटी विशेषतः मान्य केली आहे आणि आता सरकारच्या म्हणण्यानुसार या न्यायालयासमोरील प्रति-प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेल्या संबंधित पैलूंवर पुढील तपास करणे आवश्यक आहे आणि म्हणून असे सादर करण्यात आले की, फौजदारी प्रकरणामध्ये न्यायदानाच्या दृष्टीने पुढे पीडित व्यक्तीला पूर्ण न्याय देण्यासाठी आता राज्य / राज्याच्या तपास यंत्रणेलाही संविधान अधिकारांचा वापर करून पुढील तपास करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. सरकारच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान महान्यायअभिकर्ता , श्री. तुषार मेहता यांनी सरकार/ तपास एजन्सीने यापूर्वी केलेल्या तपासात काही त्रुटी/उणिवा निदर्शनास आणून दिल्या आहेत आणि प्रति-प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ४ मधील उणीवा ठळकपणे दाखवला आहेत आणि निष्पक्षपणे कबूल केले आणि प्रति-प्रतिज्ञापत्रात सुद्धा नमूद केले आहे की फौजदारी प्र. सं. कलम १७३ (८) च्या अंतर्गत अधिकारांच्या वापर करून पुढील तपास गरजेचा/ आवश्यक आहे.

५. विद्वान वकील, श्री. शेखर नाफाडे आणि डॉक्टर अभिषेक मनू सिंघवी, उत्तरवादी क्रमांक ३ आणि ५ च्या वतीने हजर झाले आणि त्यांनी या अपिलाला विरोध केला.

५.१ प्रतिस्पर्धी उत्तरवादी क्रमांक अनुक्रमे ३ आणि ५ यांच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी जोरदारपणे सादर केले की, केंद्रीय अन्वेषण विभाग विशेषतः जेव्हा आता केवळ तपासच संपला नाही तर आरोपपत्रही दाखल केले गेले आहे. परंतु, त्यानंतरही न्यायचौकशी न्यायालयाने दोषारोप सुद्धा निश्चित केले आहेत, असे असतानाही या प्रकरणात, तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यासाठी कोणतेही कारण यातून निष्पन्न होत नाही. सादर केले की, दोषारोप निश्चित केल्यामुळे असे म्हणता येईल की , खटला सुरू झाला आहे आणि म्हणून मागणी केल्याप्रमाणे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित केली जाऊ शकत नाही.

५.२ पुढे असे सादर केले की, अन्यथाही गंभीर दुखापतीचा आरोप प्रथमच केला जात आहे. असे सादर केले आहे की, अपीलकर्त्याला झालेल्या गंभीर दुखापतीच्या तथाकथित आरोपाचे, कोणताही अभिलेख किंवा दस्तावेजाचे समर्थन नाही. असे सादर केले की, अपीलकर्त्याने आपल्यावर झालेल्या जखमामुळे फ्रॅक्चर झाल्याचा आरोप कधीही केलेला नाही.

५.३ असे सादर केली की दिनांक ०६.०४.२०२० रोजी अपीलकर्त्याने दाखल केलेला प्रथम खबरी अहवालही दुखापती गंभीर असण्याबद्दल आणि कोणतेही फ्रॅक्चर झाल्याबद्दल पूर्णपणे मौन बाळगून आहे. असे सादर करण्यात आली की, पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोप पत्रात सुद्धा असे नमूद करण्यात आले आहे की, अपीलकर्त्याची शिवाजी रुग्णालयात तपासणी

करण्यात आली होती आणि झालेल्या जखमा ह्या साध्या स्वरूपाच्या आहेत असा वैद्यकीय अहवाल प्राप्त झाला होता. असे सादर केले की, अपीलकर्त्यांनी १०.०४.२०२० पोलिसांना दिलेला अतिरिक्त जबाब देखील कोणतेही फ्रॅक्चर किंवा जखम गंभीर स्वरूपाच्या असल्याच्या पैलूवर मौन बाळगून आहे.

५.४ पुढे असे सादर करण्यात आले की, माननीय उच्च न्यायालयाने परिच्छेद १६,१७ आणि २० मध्ये वस्तुस्थिती स्पष्टपणे नमूद केली आहे की, अपीलकर्ता हा कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा कागदपत्रे जे कोणतेही फ्रॅक्चर किंवा जखमा गंभीर स्वरूपाच्या असल्याचा पुरावा देतात असे सादर करण्यास अयशस्वी ठरला आहे आणि असा निर्णय दिला की, जखमा ह्या साध्या प्रकारच्या आहेत जे आरोपपत्रासहित सादर केलेल्या वैद्यकीय अहवालावरून स्पष्ट होते. असे सादर केले की, त्यामुळे गंभीर दुखापत/दुखापतींचा मोठा गुन्हा दर्शविण्यात तपास करणाऱ्या एजन्सीच्या बाजूने काही उणीव असल्याच्या आरोपात काही तथ्य नाही.

५.५ पुढे असे सादर करण्यात आले की, जेथे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत करण्याचा संबंध आहे तर ते यापूर्वीच हस्तगत केले गेले आहे, गोठविले गेले आहे आणि विद्वान दंडाधिकारी यांच्या ताब्यात आहे.

५.६ खाजगी उत्तरवादी क्रमांक अनुक्रमे ३ आणि ५ - मूळ आरोपीच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी हे जोरदारपणे सादर केले की, एकदा आरोपपत्र दाखल

केल्यानंतर दोषारोप निश्चित केले जातात आणि न्यायचौकशी सुरू होते, पुढील तपासाला परवानगी दिली जाऊ शकत नाही. या प्रकरणामध्ये असे सादर केले आहे की, पहिले आरोपपत्र ०७/१२/२०२० रोजी दाखल केले गेले आणि त्यानंतर प्रथम खबरी अहवाल क्रमांक १२०/२०२० मध्ये २८.७.२०२१ आणि १४.१०.२०२१ रोजी पुरवणी आरोपपत्र दाखल केले गेले. असे सादर केले की, प्रथम खबरी अहवाल क्रमांक ११९/२०२० मधील आरोपपत्र देखील १३.०९.२०२२ रोजी संबंधित दंडाधिकाऱ्यांपुढे सादर केले गेले आहे. असे सादर केले की, सध्याच्या प्रकरणात, संबंधित न्यायालयाने प्रथम खबरी अहवाल क्रमांक १२०/२०२० मध्ये २०.०८.२०२१ रोजी आरोपी क्रमांक १ ते १२ विरुद्ध आणि २८. ११. २०२२ रोजी आरोपी क्रमांक १३ विरुद्ध दोषारोप निश्चित केले आहेत आणि अशा प्रकारे न्यायचौकशी सुरू झाली आहे. असे सादर करण्यात आले की, तपास पूर्ण झाल्यामुळे, आरोपपत्र दाखल केले गेले आहे आणि दोषारोप निश्चित केले गेले आहेत, अपीलकर्त्याकडून पुर्न:तपासाची मागणी करणे कायद्यानुसार पूर्णपणे अनुज्ञेय आहे. **विनुभाई हरीभाई मालवीया आणि इतर विरुद्ध गुजरात राज्य आणि इतर एक, (२०१९) १७ एस सी सी १** (परिच्छेद ४२) या प्रकरणामध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केलेल्या प्रमाणे, दोषारोप निश्चित केल्यावर कलम १७३(८) चा वापर थांबतो.

५.७ असे सादर केले की, या न्यायालयाने **रामा चौधरी विरोध बिहार राज्य, (२००९) ६ एससीसी ३४६** या प्रकरणात निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केले प्रमाणे, कलम १७३ च्या उप-कलम (२) आणि उप-कलम (८) च्या साध्या वाचनावरून हे स्पष्ट होते की, तपास पूर्ण

झाल्यावर उपकलम (२) अंतर्गत पोलीस अहवाल सादर केल्यानंतरही पोलिसांना कलम १७३ च्या उपकलम (८) अंतर्गत " नव्याने तपास " किंवा " पुर्न:तपास" नाही तर " पुढील " तपास करण्याचा अधिकार आहे.

५. ८ पुढे असे सादर करण्यात आले की, जेथे अपीलकर्त्याने केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित करण्यासाठी केलेल्या मागणीचा संबंध आहे, तर अनेक निर्णयांमध्ये या न्यायालयाने निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केल्याप्रमाणे, केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपासाचे हस्तांतरण केवळ दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणांमध्येच केले जावे. **हिमांशू कुमार आणि इतर विरुद्ध छत्तीसगड राज्य आणि इतर, २०२२ एस सी सी ऑनलाईन एस सी ८८४** (परिच्छेद ४४ पासून) या प्रकरणामधील या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे. असे सादर केले कि, या न्यायालयाने, **पश्चिम बंगाल राज्य आणि इतर विरुद्ध लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी समिती, पश्चिम बंगाल आणि इतर (२०१०) ३ एस सी सी ५७१** या प्रकरणामध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केले प्रमाणे, तपास हस्तांतरित करण्याचा अधिकार हा संयमाने, सावधपणे आणि अपवादात्मक परिस्थितींमध्येच वापरला गेला पाहिजे. असे सादर केले की, या खटल्यात न्याय चौकशी न्यायालयाने आरोपपत्राच्या आधारे दोषारोप निश्चित केले आहेत, आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित करण्यासाठी कोणतेही अपवादात्मक कारण यातून निष्पन्न होत नाही.

५.९ आता, जेथे सरकारने, आता, या माननीय न्यायालयासमोर दाखल केलेल्या

प्रतिज्ञापत्रात घेतलेल्या बदलत्या भूमिकेचा संबंध आहे, असे सादर केले की, सरकारने माननीय उच्च न्यायालयासमोर संपूर्णपणे तपासाचे समर्थन केले आहे. असे सादर करण्यात आले आहे की, केवळ राज्यातील राजकीय समीकरणे बदलली असल्याने आता सरकारने कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय या प्रकरणाची पुढील चौकशी करण्याची मागणी करणारे प्रतिज्ञापत्र या माननीय न्यायालयासमोर दाखल केले आहे आणि जे कायद्याने अनुज्ञेय नाही. असे सादर केले की, या माननीय न्यायालयाने वेळोवेळी हे मान्य केले आहे की, सरकार बदलते पण राज्ये तेच राहते. **कर्नाटक राज्य आणि इतर एक वि. अखिल भारतीय उत्पादक संस्था आणि इतर, (२००६) ४ एस सी सी ( परिच्छेद ५७ ); तामिळनाडू राज्य आणि इतर विरुद्ध के. श्यामसुंदर आणि इतर (२०११) ८ एस सी सी ७३७ ( परिच्छेद ३५ ) आणि जल महाल रिसॉर्टस प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध के.पी.शर्मा आणि इतर. (२०१४) ८ एस सी सी ८०४** ( परिच्छेद ८९ ) या प्रकरणामधील या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे.

५.१० आता, सरकारने प्रतिज्ञापत्रात दाखल केलेल्या तक्त्यामध्ये, ज्यामध्ये सरकारने आरोपी क्रमांक १३ विरुद्ध नोंदवलेल्या पूर्वीच्या गुन्ह्याचा उल्लेख केला आहे, त्याचा संबंध आहे. असे सादर केले की, सरकार या माननीय न्यायालयाला पूर्वग्रह दूषित करण्याचा प्रयत्न करत आहे कारण त्या प्रकरणांची अचूक स्थिती राज्य सरकारने या न्यायालयासमोर मांडलेली नाही. असे सादर करण्यात आले की, या २४ प्रकरणांपैंकी १८ प्रकरणे एकतर राज्य सरकारने मागे घेतली आहेत किंवा संबंधित विद्वान न्यायालयांनी निकाली काढली आहेत. पुढे असे सादर केले की, एका महिलेने दाखल केलेल्या गुन्ह्यात, आरोपी क्रमांक १३ यास विद्वान

न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे आणि आरोपी क्रमांक १३ विरुद्ध प्रथम खबरी अहवाल नोंदविणारी महिला स्वतः भा.दं.सं. आणि बा.लैं.अ.सं. कायद्याअंतर्गत प्रथम खबरी अहवालाला सामोरे जात आहे. असे सादर केले की, म्हणूनच सरकारने दाखल केलेल्या प्रति-प्रतिज्ञापत्रात आरोपी क्रमांक १३ विरुद्ध नोंदविलेल्या पूर्वीच्या गुन्ह्याचा उल्लेख करून केलेले आरोप हे राजकीय सूडबुद्धी शिवाय दुसरे काहीही नाही आणि या प्रकरणातील मुद्द्याचा विचार करताना या गोष्टीचा विचार करू नये, अशी विनंती आहे.

५.११ वरील निवेदन करून, हा अपील फेटाळण्याची मागणी करण्यात येत आहे.

६. ज्या त्या पक्षकारांसाठी उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांचा व्यक्तीवाद ऐकला.

७. आक्षेपीत न्यायनिर्णय आणि आदेशानुसार, उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याच्या वतीने केलेली, केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित करण्याची मागणी नाकारली आणि प्रथम खबरी अहवाल क्रमांक १२०/२०२० मध्ये पुढील चौकशी/ पुर्न:तपास करण्याची मागणी गुणवत्तेवर आधारित आणि मुख्यतः या कारणासाठी नाकारली की एकदा तपासाअंती आरोपपत्र दाखल केल्यानंतर आणि दोषारोप निश्चित झाल्यानंतर, दंडाधिकाऱ्याला पुढील तपास /पुर्न:तपास / 'डी नोवो' ( नव्याने ) तपासाचा आदेश देण्याचा अधिकार नसतो.

७.१ म्हणून, या न्यायालयाच्या विचारात असलेला छोटा प्रश्न असा आहे की :

"प्रकरणातील वस्तूस्थिती आणि परिस्थिती मध्ये, उच्च न्यायालय तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे करण्याची मागणी नाकारण्याचे समर्थन करत आहे का आणि पुढील तपास/ पुर्न:तपास /'नव्याने तपास"? याचे आदेश देण्याचे नाकारत आहे का ?

७.२ उपरोक्त मुद्द्याचा विचार करताना आणि त्या त्या पक्षकारांच्या वतीने सादर केलेल्या निवेदनाचा विचार करताना आणि आकलन करताना, केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या अन्य एजन्सीकडे तपास हस्तांतरित करण्याच्या न्यायालयाच्या अधिकारावरील आणि पुढील तपास/ पुर्न:तपास / 'डी नोवॉ' तपास याबाबत आदेश देण्याच्या घटनात्मक न्यायालयांच्या अधिकारांवरील, या न्यायालयाच्या काही निर्णयांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे.

७.३ **हिमांशू कुमार आणि इतर ( उपरोल्लेखित )** या प्रकरणामध्ये, या न्यायालयाला इतर कोणत्याही **स्वतंत्र एजन्सीकडे** तपास हस्तांतरित करण्याच्या न्यायालयाच्या अधिकाराचा विचार करण्याची संधी होती. या मुद्द्यावरील अनेक न्यायनिर्णय विचारात घेतल्यानंतर हे पुनरुच्चारित केले जाते की, केवळ " दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्येच " तपास हा केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो. परिच्छेद ४४ ते ५३ मध्ये खालील प्रमाणे निरीक्षण केले आहे आणि मान्य केले आहे.

"४४. आता निश्चित झालेला कायदा आहे की, एक नागरिक जो उच्च सरकारी अधिकारी किंवा मातब्बर व्यक्ती व्यक्तींविरूद्ध त्याच्या कायदेशीर किंवा मूलभूत

अधिकाराचे उल्लंघन केल्याचे आरोप असलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या फौजदारी खटल्यात प्रत्यक्ष तक्रारदार आहे, त्याने जर या कथित गुन्ह्याचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे देण्याचे निर्देश देण्याची मागणी न्यायालयासमोर केली तर, अशी मागणी केवळ विचारले म्हणून मंजूर केली जाऊ नये. या न्यायालयाच्या घटनापीठाने, पश्चिम बंगाल राज्य विरुद्ध लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी समिती, पश्चिम बंगाल हे (२०१०) ३ एस सी सी ५७१ मध्ये नोंदविलेले प्रकरण, त्यात ज्या परिस्थितीत केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास सोपवण्याची परवानगी देता येईल अशा परिस्थितीबाबत खालील प्रमाणे निरीक्षण केले आहे.

"७०. ....जेथे एखाद्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभागाला निर्देश देण्याचा प्रश्न आहे, तेथे जरी अशा अधिकारांचा वापर करावा की नाही हे ठरविण्यासाठी कोणतीही साचेबंद मार्गदर्शक तत्वे मांडता येत नसली तरी, परंतु, वेळोवेळी असा पुनरुच्चार केला गेला आहे की, असा आदेश नित्याची बाब किंवा केवळ एका पक्षाने स्थानिक पोलिसांवर काही आरोप लावला म्हणून दिला जाऊ नये. **या असाधारण अधिकाराचा वापर संयमाने, सावधपणे आणि अपवादात्मक परिस्थितींमध्येच केला गेला पाहिजे जिथे विश्वासार्हता प्रदान करणे आणि तपासात आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक असेल किंवा जिथे घटनेचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिणाम असू शकतात किंवा जिथे पूर्ण न्याय आणि मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी असा आदेश आवश्यक असेल.** अन्यथा केंद्रीय

अन्वेषण विभाग हा मोठ्या संख्येने खटल्यांनी भरून जाईल आणि मर्यादित साधनांसह अगदी गंभीर प्रकरणाचा योग्यरीत्या तपास करणे कठीण होईल आणि या प्रक्रियेत असमाधानकारक तपासामुळे त्याची विश्वासार्हता आणि हेतू गमावू शकतो.

( जोर दिला)

४५. वरील निर्णयात, हे देखील निदर्शनास आणून दिले होते की, त्याच न्यायालयाने सचिव, लघु पाटबंधारे आणि ग्रामीण अभियांत्रिकी सेवा उ. प्र. विरुद्ध सहंगू राम आर्य, (२००२) ५ एस सी सी ५२१ मध्ये म्हटले होते की, केंद्रीय अन्वेषण विभागाद्वारे तपासाचे निर्देश देणारा आदेश तेव्हाच दिला जावा जेव्हा उच्च न्यायालय अभिलेखावरील साहित्याचा विचार करून या निष्कर्षावर येते कि, प्रथमदर्शनी, अशा प्रकारचे साहित्य केंद्रीय अन्वेषण विभाग किंवा इतर कोणत्याही तत्सम एजन्सी द्वारे तपास करण्याची मागणी करण्याचे प्रकरण आहे असे उघड करत नाही.

४६. एखाद्या योग्य प्रकरणात जेव्हा न्यायालयाला असे वाटते की, पोलीस अधिकाऱ्याकडून तपास योग्य दिशेने होत नाही आणि खटल्यात पूर्ण न्याय देण्यासाठी आणि कथित गुन्ह्यात उच्च पोलीस अधिकारी सहभागी असल्यास, अशा परिस्थितीत न्यायालयाने, केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या स्वतंत्र संस्थेकडे तपास सोपवणे योग्य आहे. आरोपपत्र दाखल केल्यानंतरही केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या स्वतंत्र एजन्सीकडे तपास सोपविण्याचा अधिकार योग्य प्रकरणात न्यायालयाला देण्यात आला आहे, हे आतापर्यंत चांगल्या प्रकारे निश्चित झाले आहे.

४७. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद अनुक्रमे ३२ आणि २२६ अंतर्गत घटनात्मक न्यायालयाचा केंद्रीय अन्वेषण विभागास तपास करण्याचे निर्देश देण्याचा असाधारण अधिकार या न्यायालयाने *लोकशाही हक्कांच्या संरक्षणासाठी समिती, पश्चिम बंगाल* ( *अधोरेखित* ) या प्रकरणामध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे, अत्यंत सावधगिरीने वापरणे आवश्यक आहे. येथे वर निर्देशित केल्याप्रमाणे असे निरीक्षण नोंदविले की, जरी या संदर्भात कोणतीही साचेबंद मार्गदर्शक तत्वे मांडली जाऊ शकत नाहीत, तरीही हे अधोरेखित केले गेले की, असा आदेश नित्याची बाब किंवा केवळ पक्षाने स्थानिक पोलिसाविरुद्ध काही आरोप केलेले आहेत म्हणून दिला जाऊ शकत नाही आणि अपवादात्मक परिस्थितींमध्ये लागू केले जाऊ शकतात, जेथे विश्वासार्हता प्रदान करणे आणि तपासात आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक असेल किंवा जेथे घटनेचे राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिणाम असू शकतात किंवा जेथे पूर्ण न्याय करण्यासाठी आणि मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी असा आदेश आवश्यक असेल. आम्हाला या वस्तुस्थितीची जाणीव आहे की, योग्य, निष्पक्षपाती , नि:पक्षपाती आणि परिणामकारक समाधानाच्या तपासाच्या हव्यासापोटी विश्वासार्हता आणि विश्वसनीयता नष्ट न होणे ही पुढील तपासाची किंवा पुर्न:तपासणीचे निर्देश देण्यासाठी पूर्व अट आहे, वस्तुतः आरोपपत्र सादर करणे किंवा न्याय चौकशी प्रलंबित असणे कोणत्याही प्रकारे प्रतिबंधात्मक अडथळा होऊ शकत नाही. सत्याचा उलगडा करण्यासाठी आणि पक्षांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढील तपास किंवा पुर्न:तपासणीची आवश्यकता ठरविण्यासाठी संदर्भीत तथ्ये आणि उपस्थित परिस्थिती यांचे एकेरी मूल्यमापन आणि विश्लेषण केले पाहिजे. न्यायालयाचा मुख्य उद्देश आणि प्रयत्न हा खऱ्या तथ्यांच्या जी एका वचनबद्ध ठाम आणि

सक्षम तपासी एजन्सी द्वारे शोधून काढली आहेत, त्या आधारे न्याय मिळवून देणे हा असला पाहिजे.

४८. वरील तत्त्वांचा पुनरुच्चार के. व्ही. राजेंद्रन विरुद्ध पोलीस अधीक्षक, गुन्हे शाखा गुन्हे अन्वेषण विभाग, दक्षिण विभाग, चेन्नई, (२०१३) १२ एस सी सी ४८० मध्ये करण्यात आला आहे. डॉक्टर बी एस चव्हाण, न्या. यांनी या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासाठी बोलताना खालील प्रमाणे मान्य केले आहे.

१३... या न्यायालयाने वेळोवेळी हा मुद्दा हाताळला आहे की, कोणत्या परिस्थितीत तपास, राज्य तपास यंत्रणेकडून केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या इतर कोणत्याही स्वतंत्र तपास एजन्सीकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो. असे मानले गेले आहे की, असा तपास हस्तांतरित करण्याचा अधिकार दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्ये असणे आवश्यक आहे जेथे पक्षकारांमध्ये न्याय करण्यासाठी आणि लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी न्यायालयाला आवश्यक वाटेल किंवा जेथे राज्य पोलिसांच्या तपासात विश्वासार्हता नाही आणि जेथे " निष्पक्ष, प्रामाणिक आणि संपूर्ण तपास " करणे आवश्यक आहे आणि विशेषतः, जेव्हा राज्य यंत्रणेचा नि:पक्षपाती कामकाजावर जनतेचा विश्वास टिकून ठेवणे आवश्यक असते.......".

४९. या तत्त्वाचे स्पष्टीकरण करताना, या न्यायालयाने पुढील प्रमाणे निरीक्षण केले आहे :

"१७ .... केवळ दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्ये राज्य तपास यंत्रणे कडून केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या कोणत्याही स्वतंत्र तपास यंत्रणेकडे हस्तांतरित करण्यासाठी न्यायालय आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करू शकते. जसे की, जेथे राज्य प्राधिकरणाचे उच्च अधिकारी गुंतलेले आहेत, किंवा आरोपच जर तपास एजन्सीच्या उच्च अधिकाऱ्या विरुद्ध आहेत ज्यामुळे त्यांना तपासामधे ढवळाढवळ करण्याचा परवानगी मिळते आणि पुढे असे की, जेथे न्याय करणे आणि तपासामध्ये विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे किंवा जेथे तपास प्रथम दर्शनी कलंकित/ पूर्वग्रहदोषित असल्याचे आढळून आले आहे."

५०. न्यायालयाने पुनरुच्चार केला की "दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्येच " तपास हा कें.अ.विभागाकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो. एक गोष्ट जी न्यायालय विचारात घेऊ शकते ती म्हणजे असे हस्तांतरण " राज्ययंत्रणेच्या नि:पक्षपाती कामामध्ये जनतेचा विश्वास " टिकून ठेवण्यासाठी " अत्यावश्यक" आहे. हे निरीक्षण घटनापीठाने, लोकशाही हक्काच्या संरक्षणासाठी समिती, पश्चिम बंगाल ( अधोरेखित ) या प्रकरणामध्ये केलेले निरीक्षण जसे की, केवळ पोलीसांविरुद्धचे आरोप तपास हस्तांतरित करण्यासाठी पुरेसा आधार बनत नाहीत, यासोबतच वाचले गेले पाहिजेत.

५१. रोमिला थापर विरुद्ध. युनियन ऑफ इंडिया, (२०१८) १० एस सी सी ७५३ मध्ये, या न्यायालयाच्या तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठांसमोर बोलताना आमच्यापैकी एक, ए. एम.

खानविलकर, न्या. (डॉ. डी. वाय. चंद्रचूड, न्या. असहमत) यांनी " तपास एजन्सीच्या नियुक्तीच्या बाबतीत आरोपीला काही म्हणता येत नाही " हे तत्व मांडताना पूर्व दाखल्याच्या रूपाने अधिवचन नमूद केले. या तत्त्वाचा पुनरुच्चार करताना, या न्यायालयाने आपल्या पूर्वी दिलेल्या नर्मदाबाई विरुद्ध गुजरात राज्य, ( २०११) ५ एससीसी ७९, संजीव राजेंद्र भट्ट विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, (२०१६) १ एससीसी १, इ. शिवकुमार विरुद्ध युनियन ऑफ इंडिया, (२०१८) ७ एसएससी ३६५ आणि डिवाइन रिट्रीट सेंटर विरुद्ध केरळ राज्य, (२००८) ३ एसएससी ५४२ मधील निर्णयांवर भिस्त ठेवली आहे. या न्यायालयाने निरीक्षण केले की,

"३०.... या न्यायालयाचे सातत्यपूर्ण मत असे आहे की, आरोपी हा तपास एजन्सी बदलण्यास किंवा न्यायालयाच्या देखरेखीच्या तपासासह विशिष्ट पद्धतीने तपास करण्यास सांगू शकत नाही.

५२. या न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभाग विरुद्ध राजेश गांधी १९९७ फौजदारी कायदा पुस्तिका ६३ मध्ये असे मान्य केले आहे की, एखाद्या गुन्ह्याचा तपास विशिष्ट एजन्सी द्वारे केला जावा असा आग्रह कोणीही करू शकत नाही. उपरोक्त निर्णयातील मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. पीडित व्यक्ती फक्त असा दावा करू शकते की, त्यांनी कथित केलेल्या गुन्ह्याचा तपास योग्यरित्या केला गेला जावा, परंतु त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही विशिष्ट एजन्सी द्वारे तपास केला जावा असा दावा करण्याचा त्याला अधिकार नाही.

५३. या न्यायालयाच्या पूर्व दाखल्यावरून उद्धवणारे कायद्याचे तत्व असे आहे की, तपास हस्तांतरित करण्याचा अधिकार "संयमाने" आणि केवळ " अपवादात्मक परिस्थितींमध्ये " वापरला जाणे आवश्यक आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित केला जावा या याचिकाकर्त्याने कळकळीने केलेल्या विनंतीचे मूल्यमापन करताना, त्या असाधारण अधिकाराच्या वापरासाठी या न्यायालयाने घालून दिलेल्या निर्देशांकाद्वारे आम्हाला मार्गदर्शन केले जाते.

७.४. वर चर्चा केल्याप्रमाणे कायद्याची स्थिती लक्षात घेऊन आणि प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेता, उच्च न्यायालयाने तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यास नकार देताना कोणतीही चूक केलेली नाही, असे आमचे मत आहे. अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकीलांनी देखील अशा काही मागणीचे जोरदारपणे समर्थन केले नाही. केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तपास हस्तांतरित करण्यास नकार देण्याबाबत उच्च न्यायालयाने घेतलेल्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत.

८. आता, आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आणि दोषारोप निश्चित केल्यानंतरही पुढील तपास/ ‘ डी नोवो ’ तपासाचे आदेश देण्याच्या घटनात्मक न्यायालयांच्या अधिकाराचा संबंध आहे, त्याबाबत पुढील निर्णयांचा संदर्भ घेणे आवश्यक आहे:-

८.१ **भारती तमंग ( उपरोल्लेखित)** या प्रकरणात **बाबुभाई विरुद्ध गुजरात राज्य, (२०१०) १२**

**एस सी सी २५४ ( परिच्छेद ४० आणि ४२)** या प्रकरणामधील निर्णय विचारात घेऊन आणि **राम जेठमलानी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२०११) ८ एससीसी १** या प्रकरणातील या न्यायालयाचा त्यानंतरचा निर्णय आणि मुद्द्यावरील इतर निर्णय विचारात घेऊन, शेवटी निष्पन्न झालेली तत्वे खालीलप्रमाणे आहेत : -

४१. "याचिकाकर्त्यांच्या वकीलांनी तसेच उत्तरवादींच्या वकीलांनी भिस्त ठेवलेल्या विविध निर्णयावरून, खालील तत्त्वे निष्पन्न होऊ शकतात.

४१.१. पुराव्याच्या मान्यतेची चाचणी त्याच्या संबध्दतेमध्ये असते.

४१.२ . जोपर्यंत स्पष्ट किंवा निहित घटनात्मक प्रतिबंध किंवा इतर कायदा नसतो, तोपर्यंत बेकायदेशीर शोध किंवा जप्तीचा परिणाम म्हणून सादर केलेला पुरावा बंद केला जाऊ शकत नाही.

४१.३ तपासात किंवा अभियोग पक्षाच्या खटल्यात उणीव दिसून येत असेल किंवा वस्तुस्थिती किंवा स्पष्ट कमतरता लपविण्याचा प्रयत्न करणारा पडदा उचलून असे लक्षात येत असेल, तर न्यायालयांना कायद्याच्या चौकटीत राहून मजबूत हाताने योग्य प्रकारे तोंड द्यावे लागेल.

४१.४ न्यायालयाप्रमाणेच सरकारी वकिलाचेही कर्तव्य आहे की, संपूर्ण आणि भौतिक तत्त्वे अभिलेखावर आणली जातील, जेणेकरून न्यायच्युति होणार नाही.

४१.५ फौजदारी खटला कोणत्याही कमतरतेशिवाय चालतो याची खात्री करण्यासाठी, हे न्यायालय योग्य प्रकरणांमध्ये विशेष तपास पथक देखील स्थापन करू शकते आणि केंद्र आणि राज्य सरकार यांना आणि इतर प्राधिकरणांना अशा विशेष गठित तपास पथकांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी योग्य निर्देश देखील देऊ शकते. जेणेकरून खऱ्या गुन्हेगारांना पकडता येईल आणि खटला प्रभावीपणे चालविता येईल.

४१.६ राज्याच्या इतर साधनांवर किंवा विशेष तपास पथक स्थापन करून, फौजदारी खटला सोपवताना खटला योग्य प्रकारे चालवण्याची खात्री करण्यासाठी, उच्च न्यायालय किंवा हे न्यायालय आशा तपासावर देखरेख ठेवू शकते.

४१.७ योग्य प्रकरणांमध्ये जरी आरोपपत्र दाखल केले गेले तरी पूर्ण न्याय मिळावा म्हणून या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभाग किंवा इतर कोणत्याही स्वतंत्र एजन्सीकडे सोपवण्याचा निर्देश देणे या न्यायालयासाठी किंवा उच्च न्यायालयासाठी खुला आहे.

४१.८ अपवादात्मक परिस्थितींमध्ये, न्यायालय फौजदारी न्यायच्युती रोखण्यासाठी आणि आवश्यक वाटल्यास नवीन तपासासाठी निर्देश देऊ शकते.

८.२ **धरमपाल ( उपरोल्लेखित)** या प्रकरणामध्ये, या मुद्द्यावरील अनेक निर्णयांना विचारात घेऊन असे निरीक्षण केले आणि मान्य केले की, घटनात्मक न्यायालये पुढील तपासासाठी किंवा इतर तपास यंत्रणेद्वारे तपासासाठी निर्देश देऊ शकतात. असे निरीक्षण केले की, निष्पक्ष तपास आणि निष्पक्ष न्याय चौकशी व्हावी, हा उद्देश आहे. असे निरीक्षण केले जाते की, जोपर्यंत निष्पक्ष तपास होत नाही तोपर्यंत निष्पक्ष न्यायचौकशी अत्यंत कठीण होऊ शकते. पुढे असे निरीक्षण केले आणि मान्य केले की, नवीन, ‘ डी नोवो ’ किंवा पुर्न:तपासणीचे आदेश देण्याचे अधिकार जे घटनात्मक न्यायालयाकडे निहीत आहेत, असे घटनात्मक अधिकार जे न्याय्य आणि निष्पक्ष तपासाची खात्री या उद्देशासाठी बनले आहेत त्याचा वापर करताना न्यायचौकशी सुरू झाली आहे आणि काही साक्षीदारांची तपासणी सुरू झाली आहे या बाबीचा पूर्णपणे अडथळा असू शकत नाही. असे निरीक्षण आणि मान्य करताना, परिच्छेद २४ आणि २५ मध्ये, खालील प्रमाणे निरीक्षण केले आणि मान्य केले आहे.

“२४. येथे हे लक्षात घ्यावे की, घटनात्मक न्यायालये पुढील तपासासाठी किंवा इतर तपास यंत्रणे कडून तपास करण्याचे निर्देश देऊ शकतात. हेतू हा की, निष्पक्ष तपास आणि निष्पक्ष न्याय चौकशी झाली पाहिजे. जोपर्यंत निष्पक्ष तपास होत नाही तोपर्यंत निष्पक्ष न्याय चौकशी होणे कठीण होऊ शकते. आम्हाला याची पूर्णपणे जाणीव आहे की, दुसऱ्या एजन्सीद्वारे पुढील तपासासाठी निर्देश हे अतिशय संयमाने जारी केले जाणे आवश्यक आहे.

परंतु, या प्रकरणात दर्शवलेली वस्तुस्थिती आम्हाला या अधिकाराचा वापर करण्यास भाग पाडते. आम्हाला असे वाटते की, न्यायाचा उद्देश असा आहे की, मृताचा पती जो पीडित व्यक्तीच्या छळाचे कारण आहे तो उत्तर देण्यास पात्र आहे जेणेकरून, न्यायच्युती टाळता येईल. त्यामुळे, या प्रकरणात केसचा टप्पा हा प्रशासकीय नियमानाचा घटक असू शकत नाही.

२५. आम्ही आणखी स्पष्ट करू शकतो. नवीन, ‘ डी नोवो ’ किंवा पुर्न:तपासणीचे आदेश देण्याचे अधिकार जे घटनात्मक न्यायालयाकडे निहीत आहेत, असे घटनात्मक अधिकार जे न्याय्य आणि निष्पक्ष तपासाची खात्री या उद्देशासाठी बनले आहेत त्याचा वापर करताना न्यायचौकशी सुरू झाली आहे आणि काही साक्षीदारांची तपासणी सुरू झाली आहे या बाबीचा पूर्णपणे अडथळा असू शकत नाही. हे कधी विसरता येणार नाही की जशी महासागराची एकच परीक्षा असते की जी मिठाची परीक्षा असते, त्याचप्रमाणे न्यायालयालाही एकच निकष असतो की, कोणत्याही भेदभावाशिवाय लोकांच्या व्यथेला उत्तर देण्याचा निकष. आम्ही त्वरेने अधिक सांगतो की, जर एखाद्या नागरिकाला असे वाटले की, गरीब माणसाने उच्चारलेले सत्य क्वचितच ऐकले जाते तर त्यात लोकशाही व्यवस्था उध्वस्त होण्याची क्षमता आहे. काहीच नाही तर असे म्हटले आहे की, सूर्य उगवतो आणि सूर्य मावळतो, प्रकाश आणि अंधार, हिवाळा आणि वसंत ऋतू येतात आणि जातात, काळाचा प्रवाह देखील खेळकर असतोपरंतू , जेव्हा न्याय होतो तेव्हाच सत्य राहते आणि चमकते आणि सत्याचा पुरस्कार करणे हे न्यायालयाला नैतिकदृष्ट्या बंधनकारक आहे. सत्य म्हणजे

फसवणूक नसणे, खोटेपणा नसणे आणि फौजदारी तपासात खरा आणि निष्पक्ष तपास, असा तपास नाही की जो स्वतःच एक खोटेपणा उघड करतो. हे मान्य नाही. नि:पक्षपाती आणि खरा तपास अत्यावश्यक आहे हे मनाच्या सर्वात वरच्या कप्प्यात ठेवले पाहिजे. तपासात खाच किंवा अवतलता असल्यास, तपासातील " विश्वास" हे पूर्ण सत्य मानले जाऊ शकते का ? याला खऱ्या तपासाची पवित्रता आणि शुद्धता असले का ? तपासाबाबत गंभीर शंका निर्माण झाल्यास घटनात्मक न्यायालयाने आपले हातावर हात ठेवून, आता न्याय चौकशी सुरू झाल्यामुळे प्रकरण त्याच्या पलीकडे आहे हा सिद्धांत मान्य करेल का ? हे खटल्यात सिद्ध आहे आणि जर आपण स्वतःला तसे म्हणू दिले तर ते स्थिर विचार झाले आहेत परंतु, आमच्या मते घटनात्मक न्यायालयाचे साम्राज्य 'बोन मोट ' ( विनोदी टिप्पणी ) किंवा वादविवादाने दाबले जाऊ शकत नाही. अर्थात, संशयाला एक प्रकारचा आधार आणि पाया असला पाहिजे आणि जो एखाद्याची बेफाम कल्पना नसावी. पक्षपातीपणे तपास करणे हा एक 'नॉस्ट्रम' (उत्तर) असेल असे एखाद्याला वाटेल पण, तसे न करणे म्हणजे ढोंग करण्यासारखे होईल. आधी म्हटल्याप्रमाणे वस्तू स्थिती स्वयं स्पष्ट आहे आणि दुःखी नायक, खालच्या स्तरातील व्यक्ती याने आपण " कायद्याने अनाथ" आहोत अशी भावना त्याने बाळगू नये.

९. आता, **विनूभाई हरीबाई मालवीय आणि इतर (उपरोल्लेखित)** या प्रकरणामधील या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे. प्रतिवादीच्या वतीने भिस्त ठेवली - आरोपी संबंधित आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की या निर्णयात, हे न्यायालय दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारांचा विचार करत होते. या निर्णयातही, असे निरीक्षण केले आणि मान्य केले की, न्यायालयाने 'प्रोसेस' जारी केल्यावर अचानकपणे दंडाधिकारी याचे पुढील तपासाचे आदेश

देण्याचे अधिकार  गोठवले, याचे कोणतेही योग्य कारण न्यायालयाने दिलेले नाही.  पुढे असे निरीक्षण केले की, न्यायचौकशी सुरू होईपर्यंत, गुन्ह्याचा अधिक तपास करण्याचा पोलिसांचा अधिकार चालू राहतो. पुढे असे निरीक्षण केले की, घटनेचा अनुच्छेद २१ हा निष्पक्ष आणि न्याय्य तपासापेक्षा कमी काही मागत नाही.  परिच्छेद ४२  मध्ये, ते खालील प्रमाणे निरीक्षण केले आणि मान्य केले आहे.

"४२. पुढील तपासाचे आदेश देण्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांचे अधिकार अचानकपणे ' प्रोसेस' जारी केल्यावर  का गोठतील आणि दंडाधिकाऱ्यासमोर हजर होणारा आरोपी, त्याचबरोबर,  पोलिसांचा गुन्ह्यामध्ये पुढील तपास करण्याचा अधिकार हा  न्यायचौकशी सुरू होईपर्यंत चालूच  राहतो याचे कोणतीही योग्य कारण न्यायालयाने या निर्णयांमध्ये दिलेले नाही.  असा दृष्टिकोन या न्यायालयाच्या पूर्वीच्या  निकालांची, विशेषतः, साकिरी [ साकिरी वासू विरुद्ध व  उ. प्र.  राज्य, (२००८) २  एससीसी ४०९],  समाज परिवर्तन समुदाय [ समाज परिवर्तन समुदाय विरुद्ध कर्नाटक राज्य (२०१२) ७  एससीसी ४०७], विनय त्यागी [ विनय त्यागी विरुद्ध इर्शाद  अली, (२०१३) ५  एससीसी ७६२],  हरदीप  सिंग (हरदीप  सिंग विरुद्ध पंजाब राज्य, (२०१४) ३   एससीसी ९२); हरदीप  सिंग [हरदीप सिंग विरुद्ध पंजाब राज्य, (२०१४) ३   एससीसी ९२) ज्यात स्पष्टपणे मान्य केले आहे की, फौजदारी न्यायचौकशी, दखल घेतल्यानंतर नाही,  तर दोषारोप निश्चित झाल्यानंतरच सुरू होते.  या न्यायालयाच्या अलीकडील  निकालांमध्ये ज्याला अजिबात महत्त्व दिले गेले नाही ते म्हणजे घटनेचा अनुच्छेद २१ आणि हा अनुच्छेद निष्पक्ष आणि न्याय्य  तपासापेक्षा कमी काही मागत नाही अशी

वस्तुस्थिती आहे. निष्पक्ष आणि न्याय तपासाचा असा निष्कर्ष निघेल की, दोषारोप निश्चित होईपर्यंत गुन्ह्याचा पुढील तपास करण्यासाठी कलम १७३ (८) अन्वये दंडाधिकाऱ्याच्या संमतीचा अधिकार पोलिसाकडे आहे, परंतु न्यायदंडाधिकारी यांचे हे पर्यवेक्षी अधिकार क्षेत्र, अचानक न्यायचौकशी पूर्वीच्या कार्यवाहीच्या मध्यभागी थांबते, हि न्यायाची फसवणूक होईल, कारण काही प्रकरणे पुढील तपासासाठी आक्रोश करतील जेणेकरून एखाद्या निरपराध व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने आरोपी म्हणून उभे केले जाऊ नये किंवा प्रथमदर्शनी दोषी व्यक्ती असाच सोडला जाऊ नये. दंडाधिकाऱ्याच्या अधिकाराबद्दल अशा संकुचित आणि प्रतिबंधात्मक दृष्टिकोनासाठी कोणतेही समर्थन नाही, विशेषतः जेव्हा असे अधिकार फौजदारी दंड संहितेच्या कलम १५६ (३) सह कलम १५६ (१), कलम २ (एच) आणि कलम १७३ (८) अन्वये शोधले जाऊ शकतात, जसे वर लक्षात येते, आणि न्यायचौकशी प्रत्यक्षात सुरू होण्यापूर्वी फौजदारी खटल्याच्या प्रगतीच्या सर्व टप्प्यावर उपलब्ध असतील. प्रत्येक खटल्यातील वस्तुस्थिती लक्षात घेऊन या अधिकाराचा वापर स्वाधिकारे दंडाधिकाऱ्यांनी करणे हे न्यायाच्या हिताचे असेल. पुढील तपासाचा आदेश द्यायचा की नाही हे विद्वान दंडाधिकाऱ्यांच्या विवेक बुद्धीनुसार आहे जे प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि कायद्यानुसार अशी विवेक बुद्धी वापरतील. उदाहरणार्थ, नवीन वस्तुस्थिती समोर आल्यास, ज्यामुळे विशिष्ट व्यक्तींना दोषी ठरवले जाते किंवा त्यांना निर्दोष ठरवले जाते, फौजदारी खटल्यात सत्य गाठणे आणि ठोस न्याय करणे हे, फौजदारी खटला संपवण्यात आणखी होणारा विलंब टाळण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, जसे की, हसनभाई वलीभाई कुरेशी [हसनभाई वलीभाई कुरेशी विरुद्ध गुजरात राज्य, (२००४) ५ एससीसी ३४७ मध्ये मान्य

केले आहे म्हणूनच ज्याप्रमाणात अमृतभाई शंभुभाई पटेल [अमृतभाई शंभुभाई पटेल विरुद्ध सुमनबाई कांतीबाई पटेल, (२०१७) ४ एससीसी १७७], अथुल राव [अथुल राव विरुद्ध कर्नाटक राज्य, (२०१८) १४ एससीसी २९८] आणि बिकाश रंजन रौट [ बिकाश रंजन रौट विरुद्ध राज्य ( एनसीटी ऑफ दिल्ली), (२०१९) ५ एससीसी ५४२] मधील न्यायनिर्णयांमध्ये मान्य केले आहे, या उलट ते रद्दबातल ठरतात. हे सांगण्याची गरज नाही, रणधीर सिंग राणाविरुद्ध राज्य ( दिल्ली प्रशासन) [(१९९७) १ एससीसी ३६१] आणि रिता नाग विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य [(२००९) ९ एससीसी १२९] हे देखील रद्दबातर ठरतात."

१०. जोवर उत्तरवादी - आरोपीच्या वतीने **रामा चौधरी** या (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवलेल्या बाबीचा संबंध आहे, तेथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की वरील निर्णयात, न्यायालयाने फौजदारी प्र.स चे कलम १७३ (८) आणि १७३ (८) (२) आणि " पुढील तपासा बाबतचा पोलिसांचा अधिकार याबाबतची व्याप्ती विचारात घेतली होती. पोलिसांना "नवीन तपास" करण्याचा अधिकार नाही असे दिसून आले आहे. तथापि, या न्यायालयाला **भारती तमंग (उपरोल्लेखित) आणि धरमपाल (उपरोल्लेखित)** यांच्या प्रकरणात हाताळलेल्या आणि विचारात घेतलेल्या घटनात्मक न्यायालयांच्या अधिकारांचा विचार करण्याची संधी नव्हती.

११. **धरमपाल ( उपरोल्लेखित ) आणि भारती तमंग (उपरोल्लेखित)** प्रकरणात या न्यायालयाने घालून दिलेला कायदा लागू करून आणि पूर्ण न्याय देण्यासाठी आणि निष्पक्ष तपास आणि निष्पक्ष खटला चालवण्यासाठी, घटनात्मक न्यायालय पुढील तपास/ पुर्न:तपास / 'डी नोवो' तपासाचे आदेश आरोपपत्र दाखल झाल्यानंतर आणि दोषारोप निश्चित

झाल्यानंतरही तपासाचा आदेश पारित करू शकतात. आरोपीच्या वतीने म्हणणे सादर केल्यानंतर आणि उच्च न्यायालयाच्या निरीक्षणाप्रमाणे सुद्धा एकदा आरोपपत्र दाखल झाल्यानंतर व दोषारोप निश्चित केल्यानंतर पुढील तपास/ पुर्न:तपास/ 'डी नोवो' तपासाचा कोणताही आदेश स्वीकारला जाऊ शकत नाही, अशा परिस्थितीत आरोपीस निष्पक्ष तपास / निष्पक्ष न्यायचौकशी टाळण्यासाठी हे बघणे गरजेचे आहे की दोषारोप निश्चित केले आहेत, जे न्यायाची थट्टा करण्यासमान आहे.

१२. उपरोक्त निर्णयामध्ये लागू केलेला कायदा आणि कायद्याची तत्वे वरील प्रमाणे लागू केल्यानंतर हे विचारात घेणे गरजेचे आहे की, हे प्रकरण पुढील तपास/ नवीन तपास/ पुर्न:तपास/ ' डी नोवो ' तपासासाठी सिद्ध केले आहे किंवा नाही.

१२.१ हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सध्याच्या प्रकरणात अगदी सुरुवातीपासूनच, प्रथम खबरी अहवाला मधील आरोप, आरोपी क्रमांक १३ विरुद्ध होते, जो संबंधित वेळी कॅबिनेट मंत्री उच्च पदावर विराजमान होता. तसेच त्या संबंधित वेळी जेव्हा राज्य पोलिसांनी २०२० च्या एफआयआर क्रमांक १२० चा तपास केला, तेव्हा पहिल्या दोषारोपत्रात आणि दुसऱ्या दोषारोपपत्रात आरोपी क्रमांक १३ चे नाव दिलेले नव्हते. इतकच नाही तर तपास देखील वर वर करण्यात आला होता. उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर आणि उच्च न्यायालयाने सध्याच्या कामकाजात विविध आदेश दिल्यानंतरच खरा तपास सुरू झाला. प्रथम खबरी अहवालामधील आरोप अत्यंत गंभीर होते, त्यात विद्यमान केंद्रीय मंत्र्याने त्याच्या अधिकारांचा गैरवापर करणे आणि फिर्यादीचे अपहरण आणि व्यपहरण करणे, आणि मारहाण करणे यांचा समावेश आहे. अपीलकर्ता - मूळ रिट याचिकाकर्त्याने दिनांक

१७.०४.२०२० रोजी मुंबई उच्च न्यायालय समोर फौजदारी रीट याचिका दाखल केली आणि त्यामध्ये विनंती केली की, २०२० च्या प्रथम खबरी अहवाल क्रमांक ११९ आणि २०२० च्या १२० चा तपास स्वतंत्र तपास यंत्रणेकडे हस्तांतरित केला जावा आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अंतर्गत लोकसेवकांच्या तपासासाठी आणि त्यांच्यावर अभियोग दाखल करण्यासाठी मंजुरी मिळावी दिनांक २३.०४.२०२० रोजी, उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले की सीसीटीव्ही फुटेज आणि गोळा केलेले इतर पुरावे संरक्षित केले जातील आणि मुख्य न्याय दंडाधिकारी, ठाणे यांच्या सुरक्षित ताब्यात ठेवले जातील. दिनांक ०६.०४.२०२० ते २९.०५.२०२० या कालावधीत, राज्य पोलिसांनी आरोपी क्रमांक १३ सह २३ साक्षीदारांचे जबाब नोंदवले मुख्य आरोपीचे जबाब साक्षीदार म्हणून नोंदवण्यात आले. त्यानंतर खरा तपास सुरू झाला आरोपी क्रमांक १ ते १० विरुद्ध प्रथम दोषारोपपत्र दिनांक ०७.१२.२०२० रोजी दाखल करण्यात आले. आरोपी क्रमांक १३ - तत्कालीन विद्यमान मंत्री, ज्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते, त्यांचे नाव प्रथम खबरी अहवालामध्ये नमूद असून सुद्धा त्यांचे नाव आरोप पत्रात नमूद करण्यात आले नव्हते. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून विविध अंतरिम आदेश दिल्यानंतर सी डी आर, भ्रमणध्वनी इत्यादी स्वरूपात संबंधित भौतिक पुरावे ही गोळा करण्यात आले दिनांक २८.०७.२०२१ रोजी आरोपी क्रमांक ११ आणि १२ विरुद्ध पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. पुरवणी दोषारोपपत्रातसुध्दा आरोपी क्रमांक १३ विरुद्ध दोषारोप नमूद करण्यात आले नव्हते. दिनांक २८.०८.२०२१ रोजी आरोपी क्रमांक १ ते १२ विरुद्ध दोषारोप निश्चित करण्यात आले आणि त्यानंतरच दिनांक ०५.०३.२०२२ रोजी, आरोपी क्रमांक १३ विरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले.

१२.२ उपरोक्त विवेचनावरून असे दिसून येते की, संबंधित वेळी राज्य तपास यंत्रणेने योग्य तपास केला नव्हता आणि भौतिक पुरावे देखील गोळा केले नव्हते. पुनरावृत्तीच्या भयास्तव असे दिसून येते की, उच्च न्यायालयासमोर रिट याचिका प्रलंबित असताना आणि उच्च न्यायालयाने दिलेल्या विविध आदेशांच्या अनुषंगाने, राज्य तपास यंत्रणेला या प्रकरणाचा तपास करण्यास भाग पाडले गेले आणि उशिराने मार्च २०२२ मध्ये आरोपी क्रमांक १३ विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. राज्य तपास यंत्रणेच्या म्हणण्यानुसार, अजूनही काही पैलू वर पुढील तपास करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्रमांक एक ते तीन च्या वतीने दाखल केलेल्या प्रतिज्ञा पत्राच्या परिच्छेद चार मध्ये पुढील तपासाची आवश्यकता असलेली काही उदाहरण/ उदाहरणे सांगितले आहेत. सविस्तर कारणे आणि पुढील तपास कशासाठी आवश्यक आहे सांगितले गेले नाही या कारणास्तव की, जर या टप्प्यावर ते उघड केले तर, त्यामुळे तपासाचा/ पुढील तपासाचा उद्देश विफळ होऊ शकतो.

१२.३ जरी असे असले तरी, राज्य तपास यंत्रणेच्या म्हणण्यानुसार सुद्धा, पुढील तपास आवश्यक आहे. या न्यायालयाने उपरोक्त निर्णयांमध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे आणि मान्य केल्याप्रमाणे पीडीतास निष्पक्ष तपास आणि निष्पक्ष न्याय चौकशीचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे, केवळ आरोपपत्र दाखल करणे आणि आरोप निश्चित करणे हे जर वस्तुस्थिती तशी असेल तर पुढील तपास/ पुर्न:तपास/ ‘ डी नोवो ’ तपासाच्या आदेशात अडथळा ठरू शकत नाही.

१३. आता, आरोपींच्या वतीने असे म्हणणे आहे की यापूर्वी राज्याने विद्वान महाधिवक्ता

यांच्या मार्फत रीट याची केला विरोध केला होता आणि निष्पक्षपाती तपास झाला असल्याचे सादर केले होते आणि आता सत्ताबदल झाल्यामुळे राज्य तपास यंत्रणेने आपली भूमिका बदलली आहे, आणि राज्याने संबंधित वेळी आणि आता घेतलेल्या भूमिकेशी न्यायालयांचा संबंध नाही. हे सांगणे पुरेसे आहे की संबंधित वेळी राज्य पोलीस यंत्रणेने विशिष्ट भूमिका घेतली, तेव्हा आरोपी क्रमांक १३ सत्तेमध्ये होता आणि विद्यमान मंत्री होता. वर वर्णन केलेली तथ्ये हे सुचित करतील की, पूर्वीचा तपास कोणत्या पद्धतीने पार पाडला गेला आणि आरोपी क्रमांक १३ विरुध्द फक्त मार्च, २०२२ मध्ये दुसऱ्या पुरवणी आरोपपत्रात दोषारोप नमूद करण्यात आले होते आणि जेव्हा पहिले आरोपपत्र दाखल केले होते व पुरवणी आरोपपत्रही दाखल करण्यात आले आणि इतर आरोपी विरुद्धही दोषारोप निश्चित झाले असतानाही न्यायालयाचा प्रयत्न फक्त निष्पक्षपाती तपास आणि निष्पक्षपाती न्यायचौकशी व्हावी एवढाच असला पाहिजे आणि म्हणून, वर वर्णन केलेल्या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीमध्ये, आमचे असे मत आहे की पुढील तपासासाठी प्रकरण सिद्ध केले जाते आणि राज्य तपास यंत्रणेला पुढील तपास करण्याची आणि पुढील पुरावा अभिलेखावर आणण्याची परवानगी दिली जाऊ शकते, जे कदाचित निष्पक्षपाती तपास आणि निष्पक्षपाती न्यायचौकशीच्या पुरःसरणार्थ केले जाऊ शकेल. उच्च न्यायालयाने २०२० च्या प्र.ख.अहवाल क्रमांक ११९ आणि १२० ची पुढील चौकशी करण्याचे आदेश न देण्याची आणि/किंवा राज्य पोलिस यंत्रणेला परवानगी न देण्याची अत्यंत गंभीर चूक केली आहे. उच्च न्यायालयाने येथे नमूद केलेल्या संबंधित पैलूंचा विचार केला नाही आणि म्हणून या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची खात्री दिली.

१४. वरील विवेचनानुसार आणि वर नमूद केलेल्या कारणांनुसार सध्याचे अपील अंशतः यशस्वी होते. २०२० च्या प्र. ख. अहवाल क्रमांक १२० चा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हस्तांतरित करण्यास नकार देत उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपीत न्याय निर्णय आणि आदेश कायम करण्यात येत आहे. पुढील तपास/ पुर्न:तपासाचे आदेश देण्यास नकार देत उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपीत न्याय निर्णय आणि आदेश रद्दबातल करून खारीज करण्यात येत आहे आणि आम्ही राज्य तपास यंत्रणेला २०२० च्या प्र.ख.अवाल क्रमांक १२० मध्ये तपास करण्याचे निर्देश/ परवानगी देतो, व पुढील तपास कोणत्या पैलूवर केला जाऊ शकतो हे राज्य तपासणी यंत्रणेच्या शहाणपणावर सोडले जाईल. पुढील तपास शक्यतो लवकरात लवकर चालू करून पूर्ण केला जावा व पुढील पुरवणी अहवाल शक्यतो सध्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या कालावधीत विद्वान दंडाधिकाऱ्यांसमोर खटल्यात/ त्यानंतर तत्काळ संबंधित प्रकरणाच्या न्यायालयासमोर ठेवावा, ज्याचा कायद्यानुसार आणि न्यायचौकशी न्यायालयाकडून प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार विचार केला जाईल आणि आरोपींवर त्यानुसार आणि कायद्यानुसार आणि गुणवत्तेनुसार खटला चालवला जाईल.

प्रस्तुत अपील उपरोक्त मर्यादेपर्यंत अंशतः मान्य करण्यात आले आहे.

**-x - x - x - x - x -**

**<u>अस्वीकरण</u>**

या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**- x - x - x - x - x -**